SHRI MOUNI YIDYAPEETH'S

KARMAVEER HIRE ARTS, SCIENCE, COMMERCE AND EDUCATION COLLEGE, GARGOTI.

TAL- BHUDHARGAD, DIST- KOLHAPUR

# Vachan Prerna Din - 15 October 2025

## Event Report 2025-2026

| | | |
|---|---|---|
| 1 | **Name Of The Event** | **Reading Inspiration Day** |
| 2 | **Dept./Committee** | **K.H.COLLEGE,GARGOTI**<br>**(R.V. Parulekar Library)** |
| 3 | **Name Of Teacher** | **Mr. Shailendra Bajarang Gund (Librarian)**<br>**Miss. Vaishali Udaykumar Shinde (Ass.Librarian)** |
| 4 | **Date** | **15 October 2025** |
| 5 | **TIME** | **10:00AM** |
| 6 | **CHIFE GUEST OF THE FUNCTION** | **Dr. Y.D. Dewale (Marathi Department, K.H.C.Gargoti)**<br>**Shri. S.B. Shinde (Head Master S.S.K.B. Gargoti)**<br>**Shri. Pravin Gurav (Librarian, Shri Shahu Library. Gargoti)** |
| 7 | **PRESIDED BY** | **Dr. U.R. Shinde (PRINCIPAL )** |

## वाचन प्रेरणा दिनानिमित्त कर्मवीर हिरे महाविद्यालयात व्याख्यानाचा कार्यक्रम

कोल्हापूर – कर्मवीर हिरे महाविद्यालयामध्ये श्री परूळेकर ग्रंथालय व हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 15 ऑक्टोबर 2025 रोजी *वाचन प्रेरणा दिनानिमित* "वाचन संस्कृती" या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. आधुनिक युगात वाचनाची सवय कमी होत असताना विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ग्रंथालयाशी त्यांचे नाते दृढ करणे आणि साहित्यातून प्रेरणा घेणे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या विशेष कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते **डॉ. युवराज देवाळे** यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वातून वाचनाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी साहित्यातील संदर्भात्मक उदाहरणे देऊन वाचनामुळे विचारशक्ती विकसित होते, भाषेची समृद्धी वाढते आणि व्यक्तिमत्त्व घडते हे अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, वाचन ही केवळ माहिती मिळविण्याची प्रक्रिया नसून विचारांची, संवेदनांची आणि जाणिवांची उंची गाठण्याचे साधन आहे. "वाचक घडला तर समाज घडतो" या विचाराने त्यांनी विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ. यु. आर. शिंदे** होते, तर **उपप्राचार्य संजय देसाई** , कर्मचारी प्रतिनिधी डॉ अरविंद चौगले, बी.ए.बी.एड. विभागाचे समन्वयक **शशिकांत चव्हाण** हे प्रमुख उपस्थित होते प्रमुख पाहुणे म्हणून **शाहू कुमार भवनचे मुख्याध्यापक डॉ एस बी शिंदे** व **श्री शाहू वाचनालयाचे ग्रंथपाल प्रवीण गुरव** हे उपस्थित होते. डॉ. देवाळे यांनी आपल्या भाषणात वाचनातून मिळणाऱ्या आनंदाची तुलना कुठल्याही तांत्रिक साधनाशी होऊ शकत नाही असे सांगितले. त्यांनी डिजिटल माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे ग्रंथालय संस्कृतीवर होणाऱ्या परिणामांबाबतही उपस्थितांचे लक्ष वेधले.

**शाहू कुमार भवनचे मुख्याध्यापक शिंदे सर**यांनी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याचा संदर्भ देत वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, कलाम यांचे व्यक्तिमत्त्व वाचनाच्या संस्कारातूनच घडले. विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन वाचनाची सवय आत्मसात करावी असे आवाहन त्यांनी केले.

**श्री शाहू वाचनालयाचे ग्रंथपाल प्रवीण गुरव** यांनी वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी उपयुक्त अशा विविध उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी ग्रंथालयातील नव्या पुस्तकांचे प्रदर्शन, वाचन स्पर्धा, पुस्तक परिचय सत्र अशा कार्यक्रमांमधून विद्यार्थी वाचनात सहभागी होऊ शकतात, असे सांगितले.

प्राचार्य **डॉ. यु. आर. शिंदे** यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलच्या अतिवापरापासून दूर राहण्याचे आवाहन केले. त्यांनी वाचनामुळे मनाला शांती आणि विचारांना दिशा मिळते, हे सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाचा उल्लेख करत त्यांनी म्हटले, *"जर त्यांनी वाचन केले नसते, तर आपण वाचले नसतो."* .

या कार्यक्रमात करीता डॉ युवराज दिक्षीत, प्रा. प्रविण डांगे, प्रा. डॉ. आर.एन. तहसीलदार, डॉ. एस.डी. राजरत्न, प्रा. गौतमी कांबळे, प्रा. जोती जाधव, प्रा. सातवेकर मॅडम, डॉ सुप्रिया शिंदे, प्रा. सुशांत शिंदे, इतिहास विभागाचे प्रा. मोहीतेसर, प्रा. प्रणाली शिंदे प्रा शुभांगी किरोळकर व महाविदयालयातील विदयार्थी व इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन हिंदी विभागाचे प्रा. संदिप शिंदे व श्री रा.वी. परूळेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल प्रा. शैलेश देसाई, सहा. ग्रंथपाल सौ. वैशाली शिंदे तसेच ग्रंथालय कर्मचारी श्री. सदाशिव सोरटे, श्री.दिनकर राजिगरे, श्री.दिग्वीजय देसाई, श्रीमती सविता मस्कर यांनी केले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्थशात्र विभागाच्या प्रा. डॉ. विनया रायजाधव यांनी केले, तर आभार डॉ. एस.बी. देसाई यांनी केले.

Event Photo –




GPS Map Camera
Bhativade, Maharashtra, India
84hh+8qq, Bhativade, Maharashtra 416223, India
Lat 16.327092° Long 74.131887°


GPS Map Camera
Gargoti, Maharashtra, India
849p+89q, Gargoti, Maharashtra 416209, India
Lat 16.318711° Long 74.135639°
15/10/2025 09:54 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Google
Gargoti, Maharashtra, India
84cq+25c, K.h. College Rd, Gargoti, Maharashtra 416209, India
Lat 16.32166° Long 74.135557°
15/10/2025 09:48 AM GMT +05:30


कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी • डॉ. जे. पी. नाईक सभागृह




कर्मवीर हिरे कला,शास्त्र,वाणिज्य व शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
हु. मुरलीधर नगर, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर
जानेवारी २०२६ पान नं ४
कर्मवीर
वार्तापत्र

# वाचन प्रेरणा दिनानिमित्त कर्मवीर हिरे महाविद्यालयात व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न



कर्मवीर हिरे महाविद्यालयामध्ये श्री परूळेकर ग्रंथालय व हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑक्टोबर २०२५ रोजी भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त ‌वाचन संस्कृती‌ या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. आधुनिक युगात वाचनाची सवय कमी होत असताना विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ग्रंथालयाशी त्यांचे नाते दृढ करणे आणि साहित्यातून प्रेरणा घेणे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.आर.शिंदे होते, तर उपप्राचार्य संजय देसाई, कर्मचारी डॉ अरविंद चौगले, बी. ए.बी.एड. विभागाचे समन्वयक शशिकांत चव्हाण हे प्रमुख उपस्थित होते प्रमुख पाहुणे म्हणून शाहू कुमार भवनचे मुख्याध्यापक डॉ एस बी शिंदे व श्री शाहू वाचनालयाचे ग्रंथपाल प्रवीण गुरव हे उपस्थित होते. डॉ. देवाळे यांनी आपल्या भाषणात वाचनातून मिळणाऱ्या आनंदाची तुलना कुठल्याही तांत्रिक साधनाशी होऊ शकत नाही असे सांगितले. त्यांनी डिजिटल माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे ग्रंथालय संस्कृतीवर होणाऱ्या परिणामांसंदर्भातही उपस्थितांचे लक्ष वेधले.